# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**प्रस्तावना :-** मोबाईल सेवेचे दर निश्चित करण्याबाबत.
**{सामान्य प्रशासन विभाग }** नागपूर महानगरपालिकेचे अधिकारी, कर्मचारी व आवश्यक सेवेतील कर्मचारी यांना कार्यालयीन कामाच्या दृष्टीने संपर्क साधण्याकरिता मोबाईल सिम कार्ड सेवेचे दर निश्चित करण्याकरिता यापुर्वी काढण्यात आलेल्या निविदेच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या करारनाम्याची मुदत दि. २७/०६/२०२४ रोजी संपणार असल्याने पुढील ३ वर्षाचे कालावधीकरिता दर निश्चित करण्याकरिता अपेक्षित खर्च रु. १५,१२,०००/- (पंधरा लक्ष बारा हजार रुपये) चे प्राकलन तयार करण्यात आले आहे. नविन निविदेचे कार्यादेश होईपर्यंत अस्तित्वात असलेल्या कंपनीचे मंजूर दरावर मोबाईलची सेवा सुरु ठेवणेस तथा नविन निविदा प्रक्रिया करणेचा तथा यावर होणारा अपेक्षित खर्च रु. १५,१२,०००/- (पंधरा लक्ष बारा हजार रुपये) मंजूर करणेचा प्रश्न विचारात घेणे.

खर्च दूरध्वनी पद क्र. A२८४००१२०५०५ मधून करण्यात येईल.

टिप :- सविस्तर टिपणी नस्तीत उपलब्ध आहे.

## <u>पारीत ठराव</u>

**ठराव क्रमांक :- 873/स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक :- 24/06/2024**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार अधिक्षक तथा सहा. आयुक्त (साप्रवि), सामान्य प्रशासन विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार मोबाईल सेवेचे दर निश्चित करण्याबाबत. नागपूर महानगरपालिकेचे अधिकारी, कर्मचारी व आवश्यक सेवेतील कर्मचारी यांना कार्यालयीन कामाच्या दृष्टीने संपर्क साधण्याकरिता मोबाईल सिम कार्ड सेवेचे दर निश्चित करण्याकरिता यापुर्वी काढण्यात आलेल्या निविदेच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या करारनाम्याची मुदत दि. २७/०६/२०२४ रोजी संपणार असल्याने पुढील ३ वर्षाचे कालावधीकरिता दर निश्चित करण्याकरिता अपेक्षित खर्च रु. १५,१२,०००/- (पंधरा लक्ष बारा हजार रुपये) चे प्राकलन तयार करण्यात आले आहे. नविन निविदेचे कार्यादेश होईपर्यंत अस्तित्वात असलेल्या कंपनीचे मंजूर दरावर मोबाईलची सेवा सुरु ठेवणेस तथा नविन निविदा प्रक्रिया करणेचा तथा यावर होणारा अपेक्षित खर्च रु. १५,१२,०००/- (पंधरा लक्ष बारा हजार रुपये) मंजूर करण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**डॉ. अभिजीत चौधरी (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**